# वेगळया विदर्भ मागणीचा ऐतिहासिक आढावा — एक विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार**, सहा. प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख, एस. एन. मोर कला, वाणिज्य आणि श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा

……………………………………………………………………………………………………..

**प्रस्तावना** :विदर्भ हा प्राचीन भारताच्या ऐतिहासिक घडामोडीच्या केंद्रस्थानी असून वेदशास्त्र पुराव्यामध्येसुद्धा विदर्भाचा एक समृद्ध राज्य म्हणून उल्लेख असलेला आढळून येतो. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी जवळपास एका शतकापासून अहिंसात्मक आणि लोकतांत्रिक पद्धतीने लोक आंदोलन करतांना दिसून येतात. परंतू विदर्भाचा प्रश्न हा सुटला नाही. वेगळया विदर्भाची मागणी आजची नसून ती भारताला स्वतंत्र मिळण्यापूर्वीची तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनची असून संपूर्ण विदर्भातील जनता आणि विदर्भातील जनतेचा विकास व्हावा असे मानणारी प्रतिष्ठीत मंडळी सातत्याने मांडत आहे व आजही ती कायम आहे. विदर्भ हा महाराष्ट्र राज्याचा पूर्व भाग असून वर्तमान विदर्भामध्ये नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती ही एकूण ११ जिल्हे असून २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी २१.०३ टक्के लोकसंख्या ही एकटया विदर्भामध्ये आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३१.६ टक्के भाग हा विदर्भाने व्यापलेला आहे.

संयुक्त महाराष्ट्र १ मे १९६० मध्ये अस्तित्वात येऊन यामध्ये ऐतिहासिक नागपूर करारान्वये विदर्भाचा समावेश करण्यात आला होता. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यापूर्वी विदर्भाचे आठ मराठी जिल्हे मध्यप्रदेशामध्ये सामील होती मध्यप्रांत आणि व—हाड असे या प्रातांचे जोडनाव होते. मध्यप्रदेशामध्ये सामील असलेली विदर्भातील ही आठ जिल्हे म्हणजे नागपूर वर्धा, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा हे मराठी भाषीक जिल्हे असली तरीही त्या राज्यात हिंदी भाषीक लोकांचेच वर्चस्व होते. परंतू त्या वेळी मध्यप्रदेशाची राजधानी नागपूर असल्यामुळे या मराठी भाषीक परिसराला काहीसे महत्व प्राप्त झाले आणि या हिंदी भाषिकाच्या प्रभावातून मुक्त होण्याची इच्छाही त्याच काळामध्ये निर्माण झाली. सर्वप्रथम १९३८ मध्ये बॅरीस्टर राजाराव देशमुख यांनी मध्यप्रदेशातील व—हाड प्रांतातील मराठी भाषिक प्रदेशाचा विदर्भ या नावाने स्वतंत्र प्राप्त बनविण्यात यावा अशी मागणी करणारा ठराव विधिमंडळामध्ये मांडला होता. बॅरीस्टर देशमुख त्या वेळी स्वत: मंत्रिमंडळामध्ये होते. परंतू त्या काळामध्ये विदर्भातील नेत्यांमध्ये एकमताचा अभाव असल्यामुळे विदर्भ राज्य निर्माण होऊ शकले नाही.

विदर्भ राज्याच्या मागणीचा इतिहास हा फार जुना असून स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये १८९९ मध्ये लखनौ येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये विदर्भाला स्वतंत्र प्राताचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी झाली होती. त्यानंतर १९२० मध्ये नागपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषांतर प्रांतरचना करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सेंट्रल प्रॉव्हीन्सने १९८३ मध्ये वेगळया विदर्भाचा ठराव संमत केला होता. त्यानंतर राज्य पुर्नरचना अर्थात फाजल अली कमिशनसमोर १९५३ मध्ये बापुजी अणे आणि ब्रिजलाल बियाणी यांनी वेगळया राज्याचा प्रस्ताव मांडला होता.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषावार प्रांतरचना या पुस्तकामध्ये एका भाषेची दोन राज्ये असे नमुद करून विदर्भ आणि मराठवाडयाचा उल्लेख केला आहे. तसेच विदर्भाबाबत त्यावेळच्या राजकर्त्यांच्या भूमिकेवर नाराज होऊन भाऊसाहेब बोबडेंनी आपल्या महाधिवक्ता या पदाचा राजीनामा दिला होता. पुढे यानंतरच्या काळात महाविदर्भ सभेची स्थापना होऊन त्यांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीस पाठींबा देण्याचे ठरले. याच पार्श्वभूमीवर १९५३ मध्ये अकरा कलमी ऐतिहासिक नागपूर करार करण्यात येऊन विदर्भ संयुक्त महाराष्ट्रामध्ये समाविष्ठ झाला या नागपूर करारामध्ये भविष्यातील विचार करून विदर्भाच्या विकासासाठी अनेक तरतूदी होत्या या कराराच्या तिस—या कलमामध्ये सर्वप्रथम विकासकार्य व शासन व्यवस्था याबाबतीमध्ये महाराष्ट्र राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा व उर्वरीत भाग असे तीन विभाग पाडून यांचा कल्याणकारी विकास अंतर्भूत होता. परंतू प्रत्यक्षामध्ये मात्र मागील ६६ वर्षामध्ये विदर्भ हा भाग पुर्वीप्रमाणेच मागासलेला राहून मुंबई व पश्चिम महाराष्ट्राचा दिवसेंदिवस त्या मानाने अधिक विकास होऊन तो उत्तरोत्तर वाढतांना दिसून येतो.

वेगळया विदर्भासाठी वसंत साठे, एन. के. पी. सावळे, बनवारीलाल पुरोहीत यासारख्या नेत्यांनी स्वतंत्र विदर्भ पक्षाची स्थापना करून महत्वाचे योगदान दिले. पुढे संयुक्त महाराष्ट्राला वसंतराव नाईक लोकनेते म्हणून मुख्यमंत्री मिळाले. यांनी प्रादेशिक विकासाचा आग्रह धरून जिल्हा हाच विकासाचा घटक मानुन १९६९ मध्ये ऐतिहासिक नागपूर कराराकडे पुर्णत: दुर्लक्ष केले. यानंतरच्या काळामध्ये जांबुवंतराव धोटे यांनी सुद्धा विदर्भावीर म्हणून विदर्भाच्या वेगळया विदर्भाच्या मागणीला नेतृत्व दिले या काळामध्ये विदर्भाच्या मागणीने बराच जोड पकडला असला तरी विदर्भातील स्वार्थी राजकारणामुळे एकतेच्या आणि इच्छाशक्तीच्या अभावामुळे मागणी पुर्णत्वास येऊ शकलेली नाही. ती आजही तशी रेंगाळत आहे. आज श्रीहरी अणे सारख्या नेत्यांच्या माध्यमातून वेगळया विदर्भाची मागणी जोर धरत आहे. यांच्या मते नागपूर करारामध्ये विदर्भातील लोकांना आर्थिक सोयी, नौक—या तसेच शैक्षणिक सुविधा या २२ टक्के मिळतील असे नमुद केले असले तरी आजपर्यंत त्या बाबी मागील लगतच्या काळातील आढावा घेता विदर्भवासियांना मिळा—या नाहीत उलट ५२ टक्के नौक—या पुणे विभागाला दिल्या तर सर्वात कमी म्हणजे २.५ टक्के नौक—या नागपूर व अमरावती विभागाला दिल्या. १९८४ मध्ये दांडेकर समितीने १४०० कोटी विदर्भावर खर्च व्हावा अशी शिफारश केली होती. परंतू अजुनही त्याची पुर्तता सरकार करू शकलेली नाही. अशा प्रकारे पश्चिम महाराष्ट्राने मागील काळामध्ये विदर्भाच्या विकासाचा निधी आपल्या प्रदेशाच्या विकासाकरीता लावून विदर्भाला कायम अविकसित ठेवले.

२०१० मध्ये विदर्भवादी पक्ष एकत्र येऊन विदर्भ बंद पुकारला याला कानाकोप—यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आजही जनतेचा वेगळया विदर्भासाठी मोठया प्रमाणात पाठिंबा असून ती आपल्या मतावर ठाम आहे. विदर्भावर महाराष्ट्र सरकारने फार मोठा अन्याय केला आणि आजही होत आहे अशी ओरड विदर्भवासियांकडून होत असून पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत

विदर्भाला महाराष्ट्र सरकारकडून दुय्यम वागणूक मिळत असून राजकीय तसेच आर्थिक औद्योगिकरणाच्या दृष्टीकोनातून आमचा विकास झाला नसून आम्ही खूप मागासलेले आहोत असे स्पष्ट मत बनले आहे. मागील २०१० च्या काळामध्ये शेजारील आंध्रप्रदेशातून तेलंगना स्वतंत्र राज्य निर्माण झाल्यामुळे वेगळया विदर्भाची मागणी अधिकच जोर धरू लागलेली दिसून येते.

**स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचे कारणे पुढीलप्रमाणे :**

**१) प्रादेशिक असमतोल:** महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न फार मोठा असून मागील ६६ वर्षाचा विचार केला असता जास्तीत जास्त उद्योगधंदे पश्चिम महाराष्ट्राच्या भागात स्थापन झालेले दिसून येतात. मात्र त्याप्रमाणामध्ये विदर्भात खूपच कमी उद्योगधंदे निर्माण झाले त्यामुळे विदर्भामध्ये बेकारी—बेरोजगारी वाढून लोकांचे दरडोई उत्पन्न घटून आर्थिक विकास खुटलचे दिसते.

**२) विदर्भ भौगोलिकदृष्टया सक्षम :** विदर्भाला सातपुडा पायथा लाभलेला असल्याने नैसर्गिक साधनसंपत्ती मोठया प्रमाणात असून ७५ टक्के वनसंपत्ती आहे. कोळसाच्या मोठया प्रमाणात खाणी असून अभ्रक, बॉक्साईट, पोलाद, तांबे इत्यादी खनिजे मुबलक प्रमाण आढळून येतात. या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारावर सीमेंटचे तसेच वीजनिर्मितीचे उद्योग कारखाने मोठया प्रमाणात उभे राहू शकतात. विदर्भामध्ये संत्रा, कापूस, सोयाबिन, तूर, धान, लिंबू इत्यादीचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असल्याने यावर प्रक्रिया करणारे लहान—मोठे उद्योग उभे केल्यास विदर्भामध्ये मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन बेरोजगारी दूर होऊ शकते. तसेच विदर्भ हे भारताच्या मध्यस्थानी येत असल्याने ते भारताच्या अंतर्गत व्यापाराचे केंद्र सुद्धा बनु शकते. परंतू राजकीय उदासिनतेमुळे हे होत असतांना दिसत नाही.

**३) सिंचन प्रकल्पाचा अभाव :**कृषीप्रधान भारतामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, कोल्हापूर, बारामती, सांगली व साताराकडील भागामध्ये सिंचनाची मोठया प्रमाणात व्यवस्था असून तेथील शेतकरी बारमाही पिके घेतांना दिसून येतात तर विदर्भातील सिंचनाचा अनुशेष अजुनही पूर्ण न झाल्यामुळे येथील शेतकरी आत्महत्या करतांना दिसून येतो.

**४) ऐतिहासिक नागपूर कराराकडे दुर्लक्ष :**संयुक्त महाराष्ट्रामध्ये विदर्भ विलीन होत असतांना १९५३ मध्ये केलेल्या ऐतिहासिक नागपूर कराराद्वारे विदर्भाला सर्वच भागामध्ये न्याय वाटा दिला जाईल असे सर्वमताने स्पष्ट केले होते परंतू आज याचे पालन होतांना दिसत नसून सतत दुर्लक्षच झालेले दिसते.

**५) प्रशासकीयदृष्टया सोयीचे आणि कमी खर्चिक :**लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार करता महाराष्ट्र मोठे राज्य आहे. त्यावर नियंत्रण ठेवणे दिवसेंदिवस कठीण कार्य होत आहे. गोंदिया आणि गडचिरोलीतील लोकांना प्रशासकीय कामासाठी राजधानी मुंबईला यायचे म्हटले म्हणजे वेळ आणि पैसा दोन्ही दृष्टीने परवडणारे नाही. तसेच प्रशासकीय कामात सुद्धा दिरंगाई होते. म्हणून योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी आजच्या आधुनिक जागतिकीकरणाच्या काळामध्ये कल्याणकारी राज्याची भूमिका ख—या अर्थाने पार पाडण्यासाठी विदर्भ राज्य निर्माण होऊन नागपूर हे राजधानीचे ठिकाण होणे जनतेला सोयीचे आहे.

**६) वैधानिक विकास मंडळाकडून निराशा :**भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३८२(२) व्या नुसार प्रादेशिक अनुशेष भरून काढण्यासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली होती. परंतू याच्या माध्यमातून विदर्भाचा कोणताही विकास न होता वाटयाला निराशा आली. देशातील छोटया घटक राज्याचा आदर्श घेता हरियाणा, पंजाब यासारख्या लहान लहान राज्याचा विकास फार मोठया प्रमाणात झालेला दिसून येतो. छोटी राज्य विकासाच्या सर्वच दृष्टीकोनातून फायद्याची असतात असा विश्वास विदर्भावासियांमध्ये निर्माण झालेला आहे.

**७) राजकीय उदासिनता :**महाराष्ट्राचा एकूण विचार करता मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधारकराव नाईक आणि आजचे देवेंद्र फडणविस हे चार मुख्यमंत्री विदर्भाचे असले तरीही पश्चिम महाराष्ट्राचा प्रभाव अधिकच आहे. तसेच विदर्भाला दिलेल्या दुय्यम वागणूकीमुळे विदर्भातील जनता नाराज असून राजकीय नेतृत्व स्वार्थी, धुर्तपणाचे असल्यामुळे तसेच त्यांच्यात एकमत नसल्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण होण्यास अनेक अडथळे निर्माण झालेले आहेत. विदर्भातील संसाधनावर सांगोपांग चर्चा होऊन सक्षम विदर्भ राज्य असेल यावर नागपूरला अनेक वेळा चर्चा झाली. ॲड. श्रीहरी अणे मते केवळ आंदोलन करून विदर्भ राज्य मिळत नाही तर राजकीय ताकदीच्या माध्यमातून दबाव निर्माण करणे आवश्यक आहे.त्यासाठी विदर्भ राज्य आघाडी पक्ष म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक लढवेल. यासाठी तरूणाचे सहकार्य आवश्यक आहे. वेगळा विदर्भ राज्य झाल्यास ब—याच वर्षापासून पूर्ण न झालेल्या सिंचनाचा अनुशेष भरून निघेल. विदर्भ नैसर्गिक साधन संपत्तीने परिपूर्ण असूनही महाराष्ट्रामध्ये विदर्भ हा उपेक्षित भाग आणि सर्वाधिक मागासलेला प्रदेश ठरविला आहे. तसेच शेजारील मध्यप्रदेशातून वेगळे राज्य झालेले छत्तीसगड, आंध्रप्रदेशातून वेगळे झालेले तेलंगणाचे प्रशासकीय मार्गक्रमण आणि समाधानकारक विकास पाहता विदर्भ राज्य वेगळे होण आवश्यक असून संपूर्ण विदर्भातील जनतेच्या हिताचे आहे. वेगळे विदर्भ राज्य झाल्यास विदर्भातील बेरोजगारी, कुपोषण, शेतकरी आत्महत्या, नक्षलवाद, कुमारी माता प्रकरणे, आर्थिक विषमता इत्यादी सारख्या समस्या सोडविण्यासाठी मदत होईल. आज भाजपासारख्या राजकीय पक्षांनी १९९१, १९९६, २०१४ इ. च्या विधानसभा आणि लोकसभा निवडणूकांमध्ये विदर्भ राज्य वेगळे करण्याचे आश्वासन दिलेले आहे.वरील सर्व बाबींवरून वेगळया विदर्भ राज्याच्या संदर्भामध्ये विदर्भवासियांच्या आशा—आकांक्षा आणि विदर्भातील जनतेची ठाम भूमिका विचारात घेता लगतच्या काळामध्ये स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही असेच चित्र दिसते.

**संदर्भ सूची :**

१) कोलाटकर, श. गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास (१८८७—१९४७), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३.
२) देशोन्नती, २८ मार्च २०१६,१९ फेब्रुवारी २०१७.
३) वक्काणी नी. आ., आधुनिक विदर्भाचा इतिहास (१८४७—१९५०), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३.
४) Navjyot, Vol. IV / Issue – 1 / March 2015
५) गाढाळ एस. एस., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८—१९६०), के. एस. अतकरे कैलाश प्रकाशन्स, औरंगाबाद